# शिक्षकांसाठी सूचना प्रथम भाषा : मराठी - इयत्ता : सहावी

## संकलित मूल्यमापन २ : २०१७-१८

### इयत्ता - सहावी, विषय : मराठी

| लेखी | तोंडी | एकूण गुण |
|---|---|---|
| ४० | १० | ५० |

**शिक्षकांसाठी महत्त्वाचे :**

- शासन निर्णय दि. १४ जुलै २०१७ नुसार 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' कार्यक्रमातील चाचण्यांतून त्या त्या इयत्तांच्या क्षमतांबरोबरच प्रत्येक विद्यार्थ्याने शिकण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत क्षमतांच्या संपादणुकीची पडताळणी करणे आवश्यक आहे.
- राज्यात '१००% विद्यार्थ्यांचा मूलभूत वाचन क्षमता विकास कार्यक्रम' कार्यान्वित झाला आहे. या कार्यक्रमात प्रत्येक विद्यार्थ्याला मूलभूत वाचन क्षमता प्राप्त होण्यासाठी विद्यार्थिनिहाय कृती कार्यक्रम घेण्यात येत आहे. संकलित चाचणी-२ द्वारे त्या त्या इयत्तेच्या क्षमतांबरोबरच प्रत्येक विद्यार्थ्याची मूलभूत वाचन क्षमता पडताळून पाहणे अपेक्षित आहे.
- इयत्ता दुसरी ते आठवीच्या प्रश्नपत्रिकांमध्ये प्रकट वाचनासाठी दिलेले उतारे प्रत्येक विद्यार्थ्याच्या केवळ मूलभूत वाचन क्षमतेची पडताळणी करण्यासाठी आहेत. शिक्षक सूचना पत्रिकेत दिलेल्या निकषानुसार त्यासाठी गुणदान करावे.
- प्रत्येक इयत्तेत मूलभूत वाचन क्षमतेसाठी ५ गुण (मोठ्या आवाजात वाच) व मूलभूत लेखन क्षमतेसाठी ५ गुण (शब्द ऐकून लिही) असे एकूण १० गुण मूलभूत क्षमतांवर आधारित प्रश्नांसाठी आहेत.
- इयत्तानिहाय समजपूर्वक वाचन क्षमता तपासण्यासाठी स्वतंत्र गद्य/पद्य उतारा देण्यात आला आहे. तो प्रत्येक मुलाला वाचायला द्यावा व शिक्षक सूचना पत्रिकेतील निकषानुसार गुणदान करावे.

## लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना

**प्र. १) शब्द ऐकून लिही.** (गुण ५)

**क्षेत्र :** लेखन (श्रुतलेखन)

**उद्दिष्ट :** जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे लेखन तपासणे.

**सूचना :**
- यादीतील शब्द मोठ्याने व स्पष्ट वाचावा. शब्दाचा अर्थ लक्षात यावा म्हणून शब्द सलग वाचावा.
- मग २ सेकंद थांबून शब्द पुन्हा वाचावा.
- मुलांचा शब्द लिहून झाल्यावर त्यांना शब्द तपासण्याची सूचना देऊन शब्द पुन्हा एकदा वाचावा.

**शब्द :**

| | |
|---|---|
| १) सहल | २) चाबूक |
| ३) आकारमान | ४) रोजनिशी |
| ५) दिनांक | ६) डौलदार |
| ७) डॉलर | ८) ग्रंथालय |
| ९) आच्छादित | १०) फॅशन |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण याप्रमाणे गुणदान करावे.**

हा प्रश्न तपासताना पुढील बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखननियमांनुसार बरोबर असेल तरच गुण द्यावा. उदा. 'डौलदार' ऐवजी 'डऊलदार' किंवा 'फॅशन' ऐवजी 'फ्याशन' असे लिहिल्यास गुण देऊ नये.

**प्र. २) खालील उतारा मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**अ)** आईने अजयला सहलीची फी दिल्यामुळे. (गुण १)

**ब)** अत्यंत साधा, सरळ, सहकार्यवृत्तीचा, हुशार, खेळात प्रवीण. (गुण २)
(वरील गुणवैशिष्ट्यांपैकी दोन गुणवैशिष्ट्ये लिहिल्यास एक गुण, चार गुणवैशिष्ट्ये लिहिल्यास दोन गुण)

**क)** सहलीची फी आई भरू शकत नव्हती. घरातली ओढाताण त्याला जाणवत होती. म्हणून अजयने सहलीचा विषय घरात काढला नाही. (गुण २)
(वरील दोन कारणांपैकी कोणतेही एक कारण लिहिल्यास १ गुण द्यावा. दोन्ही लिहिल्यास २ गुण द्यावेत.)

**प्र. ३) खालील कविता मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**अ)** मानवतेचा (गुण १)

**ब)** प्रयत्न केले पाहिजेत, श्रम केले पाहिजेत, अडचणींना सामोरे गेले पाहिजे. (गुण २)
(वरील तीनपैकी एक लिहिल्यास एक गुण. दोन किंवा त्यापेक्षा अधिक लिहिल्यास दोन गुण.)

**क)** काट्यांमधल्या वाटांमधुनि, चालत जा तु पुढे पुढे । (गुण २)

**प्र. ४) खालील मजकूर मनात वाच आणि प्रश्नांची उत्तरे लिही.** (गुण ५)

**अ)** कळप चांदवर विसंबून निर्धास्तपणे वावरत होता. (गुण १)

**ब)** मस्तकाचे ओझे पेलणे, फांदी तोडायला सोंड वर करणे, दडादडा धावणे, उतरणीवर तोल सांभाळणे, पुढल्या पायावर जोर देत उभा चढ चढणे. (गुण २)
(यापैकी एक बाब लिहिल्यास एक गुण द्यावा. दोन किंवा त्यापेक्षा अधिक बाबी लिहिल्यास दोन गुण द्यावेत.)

**क)** हत्तीसाठी वापरला आहे. फांदी तोडायला सोंड वर करणे जड झाले होते. (गुण २)
(अशा आशयाचे उत्तर स्वीकारणे. एका मुद्द्यास एक गुण द्यावा. वरील दोन्ही मुद्दे आल्यास दोन गुण द्यावेत.)

**प्र. ५) खालील प्रश्न दिलेल्या सुचनेनुसार सोडव.** (गुण १०)

**योग्य उत्तरे व गुणदान**

**अ)** कर्ता - अविनाश कर्म - कॅरम (गुण २)

**ब)** स्वतःची, त्याने, तू, मी, त्याची (गुण २)
(वरील पाचपैकी चार बरोबर सर्वनामांस प्रत्येकी अर्धा गुण याप्रमाणे एकूण दोन गुण द्यावेत.)

**क)** संयुक्त क्रियापद लिहिल्यास एक गुण व संयुक्त क्रियापदाचे वाक्य लिहिल्यास एक गुण. (गुण २)

**ड)** काळ - भूतकाळ (गुण २)
(काळ ओळखल्यास एक गुण. काळाचे योग्य वाक्य लिहिल्यास एक गुण)

**इ)** सारा गाव मामाचा नि एक नाही कामाचा. (गुण १)

**फ)** नवल वाटले. (गुण १)

**प्र. ६) १५ ऑक्टोबर 'वाचन प्रेरणा दिन' या निमित्त शाळेत निबंध स्पर्धा आयोजित केली आहे. त्यासाठी तू पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर लिही.** (गुण ५)

१) मला आवडलेले पुस्तक २) पुस्तक बोलू लागले तर.. ३) वाचनाचे महत्त्व

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्दिष्ट :** स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :**

| **गुण** | **निकष** |
|---|---|
| ५ | • मांडलेल्या मुद्द्यांतून विषयाची परिपूर्ण कल्पना येते. किमान ५० शब्दांत लेखन केलेले आहे.<br>• मुद्द्यांशी संबंधित उदाहरणे देऊन, स्पष्टीकरणातून लेखनाचा विस्तार केलेला आहे.<br>• लेखाची मांडणी सुसंगत व ओघवती आहे.<br>• मुलाच्या विषयातील विचार सुस्पष्ट आहेत. |
| ४ | • मांडलेल्या मुद्द्यांतून विषयाची परिपूर्ण कल्पना येते.<br>• मुद्द्यांशी संबंधित उदाहरणे, स्पष्टीकरणे दिली आहेत. पण ही कमी/मर्यादित स्वरूपाची असू शकतात.<br>• विषयाची मांडणी सुसंगत आहे. पण एक-दोन ठिकाणी लेखन मुद्द्यापासून भरकटले आहे.<br>• वाक्यरचना नीट आणि वाक्यांचा पल्लाही वाढलेला आहे. |
| ३ | • निवडलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.<br>• वाचकाला विषयाची नीटशी कल्पना येण्यासाठी पुरेसे मुद्दे मांडलेले आहेत.<br>• मांडलेल्या कल्पनांचा एकमेकांशी संदर्भ लावलेला आहे.<br>• कल्पनांचा/तपशीलाचा विस्तार केलेला नाही किंवा खूपच थोड्या प्रमाणात केला आहे. |
| २ | • निवडलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन लेखन केले आहे; पण<br>• वाक्यरचना नीट नाही<br>• मर्यादित कल्पना मांडलेल्या आहेत.<br>• विषयातील मांडलेल्या कल्पनांचा एकमेकांशी संदर्भ लावलेला नाही. |
| १ | दिलेल्या विषयांपैकी एका विषयाचा विचार करून सुट्या सुट्या वाक्यांचे लेखन केले आहे. |
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा दिलेल्या विषयांचा विचार न करता केलेले असंबद्ध लिखाण केले आहे. |

**प्र. ७) खाली काही शब्द दिलेले आहेत. त्या शब्दांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही.** (गुण ५)
शेती, जहाज, रात्र, दप्तर

**क्षेत्र** : स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्‌दिष्ट** : स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान** :

| गुण | निकष |
|---|---|
| ५ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन सुसंगत अर्थपूर्ण लेखन. गोष्टीला सुरुवात आणि शेवट आहे. गोष्ट खुलवण्यासाठी बारकावे व तपशील दिले आहेत. वेगवेगळ्या पात्रांना भूमिका / संवाद दिलेले आहेत. किमान ५० शब्दांत लेखन केलेले आहे. |
| ४ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन सुसंगत अर्थपूर्ण लेखन. गोष्टीला सुरुवात आणि शेवट आहे. |
| ३ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन गोष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| २ | दिलेल्या शब्दांवरून संदर्भ घेऊन सलग लेखन, परंतु वाक्यरचना विस्कळित आहे, गोष्ट नाही, त्रोटक लेखन केले आहे. |
| १ | शब्दांची नुसती सुटी सुटी वाक्ये लिहिलेली आहेत. वाक्यात सलगता नाही. |
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा केवळ शब्दलेखन केलेले आहे. |

## तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना

**प्र. ८) खालील उताऱ्याचे वाचन करून घेणे.** (गुण ५)

**उद्दिष्ट :**

- हा प्रश्न विद्यार्थ्यांची मूलभूत वाचन क्षमता तपासण्यासाठी आहे.

**प्रश्नकर्त्यांसाठी सूचना :**

- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून घ्यावयाचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसांत चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना : मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच.**

**उतारा :**

**रविवारचा दिवस, शाळेला सुट्टी होती. हवेत खूप उकाडा जाणवत होता. कबीर आणि मीरा अंगणात झाडाखाली खेळत होते. अचानक आकाशात काळेकाळे ढग जमले. विजांचा कडकडाट सुरू झाला. पावसाचे टपोरे थेंब पडायला लागले. कबीर आणि मीरा पावसात चिंब भिजले. अंगणात पाणी वाहू लागले. दोघेही पाण्यात नाचले. अंगावर पाणी उडवले.**

**तासाभराने आतून आईचा आवाज आला. ''कबीर, मीरा झालं ना खेळून आता? चला कपडे बदलून घ्या.''**

**वाचनासाठीचे गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ५ | उताऱ्याचे योग्य गतीने विरामचिन्हे लक्षात घेऊन केलेले वाचन. |
| ४ | काही वाक्यांचे विरामचिन्हे लक्षात घेऊन केलेले वाचन. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन. वाचनातून वाक्याचा बोध होतो आहे. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा व अर्थाचा बोध होत नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन, वाचनातून वाक्याचा बोध होत नाही. |
| ० | उतारा वाचण्यात रस दाखविला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |

प्र. ९) खालील उताऱ्याचे वाचन करून घेणे. (गुण ५)

**प्रश्नकर्त्यांसाठी सूचना :**

- हा प्रश्न मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे.
- हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे.
- वर्गात जास्त मुले असल्यास दोन ते तीन दिवसांत चाचणीचा हा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना : मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा वाच. मग मी तुला काही प्रश्न विचारणार आहे, त्यांची उत्तरे तू द्यायचीस.**

**उतारा :**

**संध्याकाळ झाली, की सुधाची आजी सगळ्यांचा स्वयंपाक करायची. त्यासाठी ती सुधाला घराच्या मागच्या अंगणातील कोठीत पाठवायची. तेथे लाल रंगाचे तांदूळ साठवलेले असत. आजी जेवढी मापटी तांदूळ मागेल, तेवढे मोजून सुधा तिला द्यायची. मग आजीचा रात्रीचा स्वयंपाक सुरू होई.**

**हे असे कित्येक वर्षे चालू होते. सुधा जराशी मोठी झाल्यावर तिच्या मनात घोळत असलेला एक प्रश्न तिने तिच्या आजोबांना विचारला. ''आपण रात्रीच्या जेवणासाठी नेहमीच लाल तांदळाचा भात शिजवतो. तो तांदूळ चांगला नसतो, जाडा असतो; पण आपल्याकडे लोक भिक्षा मागायला येतात, त्यांना तेवढा आपण पांढराशुभ्र तांदूळ देतो. असं का?''**

**त्यावर तिथेच काम करत असलेली तिची आजी कृष्णाक्का हसली व तिने सुधाला जे उत्तर दिले, ते तिच्या मनावर कायमचे कोरले गेले आहे. जे ती आजन्म विसरू शकणार नाही. ते म्हणजे, ''बाळा, हे बघ, आपल्याला जर दुसऱ्या कुणाला काही द्यायचंच असेल, तर नेहमी आपल्याकडे जे चांगल्यात चांगलं असेल, ते द्यावं. निकृष्ट दर्जाचं कधी देऊ नये.''**

**आता मुलाने वाचलेल्या उताऱ्यावर आधारित खालील प्रश्न विचारणे.** (गुण ५)

- उत्तरे शोधण्यासाठी उतारा परत वाचण्याची संधी मुलास द्यावी.

| | योग्य उत्तर | गुण |
|---|---|---|
| **अ) आजी सुधाला मागच्या अंगणातील कोठीत का पाठवायची?** | (२) | (१) |
| १) लाल रंगाचे तांदूळ बघण्यासाठी | | |
| २) लाल रंगाचे तांदूळ मोजून देण्यासाठी | | |
| ३) पांढऱ्या रंगाचे तांदूळ मोजून देण्यासाठी | | |
| **ब) सुधाने आजोबांना कोणता प्रश्न विचारला?**<br>आपल्याकडे लोक भिक्षा मागायला येतात, त्यांना तेवढा आपण पांढरा शुभ्र तांदूळ देतो. असं का? या आशयाचे उत्तर अपेक्षित. | | (२) |
| **क) कृष्णाक्काने सांगितलेली कोणती गोष्ट सुधा आजन्म विसरू शकणार नाही?**<br>(आपल्याकडचे जे चांगले आहे ते द्यावे किंवा आपल्याकडे असलेले निकृष्ट देऊ नये या आशयाचे उत्तर अपेक्षित.) | | (२) |

■■■